माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
०३।१०।२०२५

कृपया प्रसिध्दी करिता

# प्रेस नोट

## आता मलेरीया रुग्णांचे निदान होणार लवकर !
## एकूण ५०० आशा प्रशिक्षण व साहित्यासह सज्ज

दि: २९.०९.२०२५

वाढत्या औद्योगीकरणामुळे व नागरीकरणामुळे शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात बाहेरील जिल्ह्यामधून तसेच बाहेरील राज्यामधून नागरिकांचे स्थलांतर होत असते. वाढत जाणारी बांधकामे व वस्त्या यांमुळे पावसाचे पाणी साठून डासांची उत्पत्ती होत असते. मलेरिया रोगाच्या प्रसारासाठी हे अनुकूल वातावरण असते.मलेरीया रुग्णांचे लवकर निदान झाल्यास व त्यावर समूळ उपचार झाल्यास रोगाच्या प्रसाराचा धोका कमी होतो.याकरिता पुणे महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात येते.प्रत्यक्ष सर्वेक्षणात वस्ती पातळीवर तापी रुग्णांच्या मलेरिया स्लाईडस घेवून तात्काळ उपचार करण्यात येतात. मलेरिया विभागात पुरेश्या मनुष्यबळाची नियुक्ती होईपर्यंत मे.राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आशा स्वयासेविका यांना याकामी प्रशिक्षण देवून सज्ज करणे आवश्यक आहे.
त्यानुसार महानगरपालिकेने ऑगस्ट महिन्यात २०० आशांचे प्रशिक्षण पूर्ण करून त्यांना मलेरीया स्लाईड कीटचे वाटप केले होते.

इडियाडा ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी पुणे महानगरपालिकेच्या सीएसआर विभागाकडे आरोग्य विषयक उपक्रमात सहभागी होण्याची तयारी दर्शविली.त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या कीटक प्रतिबंधक विभागाने आणखी ३०० आशांचे प्रशिक्षण घेणेकामी ३०० आशा स्लाईड्स कीटची आवश्यकता असल्याचे सांगितले.त्यानुसार सबंधित संस्थेच्या सीएसआर मॅनेजर श्रीमती दिपाली काळे यांनी सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.राजेश दिघे यांचे सहकार्याने नवरात्र उत्सवादरम्यान आशांचे सबळीकरण करण्याचे नियोजन केले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ.नीना बोराडे यांनी भूषविले यावेळी इडियाडा ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कडील हेड एचआर श्रीमती दिव्या पंत , वर्शिप अर्थ फाउंडेशन कडील सीईओ श्री. दिनेश कदम .सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.राजेश दिघे हे उपस्थित होते.
आशा स्वयंसेविकांचे प्रशिक्षण हे पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील श्री.संदेश देशपांडे ,श्रीमती मिथिला रानडे ,श्रीमती शोभा बनकर ,श्री.विशाल रुपणार व श्री.नितीन विचारे यांनी घेतले .

सदर कार्यक्रमाची सांगता आशा स्वयंसेविकांना स्लाईड कीटचे वाटप करून झाली .कार्यक्रम प्रसंगी उपस्थित आशांनी मेलरीया निर्मूलनात मोलाचे कामकाज करण्याबाबत सर्वाना आश्वस्त केले.